# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६११
E-Mail: jtdirrom@gmail.com Web: www.jdteromumbai.com


अत्यंत महत्वाचे

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३/२०१३/ 1687
दिनांक : 14 MAY 2013

S. P. I. T.
Inward No. 1254
Date 15/5/13
Dept Off Ce.

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय/अनुदानित
व विनाअनुदानीत पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय :- जात वैधता प्रमाणपत्राबाबत.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्र क्रं.संकीर्ण-२०११/प्र.क्र.३२५/तांशि-४ दि.२५.६.२०१२

उपरोक्त विषयासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्राप्त झालेल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतांना जात वैधता प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करण्यावावतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक होते.

तथापि शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये सर्व, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी <u>प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे राहील</u> असे नमूद केलेले आहे. तरी सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थांनी कार्यवाही करावी व संस्थेच्या प्राचार्यांनी खालील गोष्टींचा कटाक्षाने अवलंब करावा.

१. प्रवेशच्या संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास ही बाब आणावी.
२. सदर बाब प्रवेश प्रक्रिया चालु करण्यापुर्वी संस्थेच्या मुख्य सुचना फलकावर सर्व विद्यार्थी व पालकांना निदर्शनास येण्याच्या दृष्टीने प्रदर्शित करावी व प्रत्येक संस्थेने आपापल्या वेबसाईडवर ठेवावी.

सदर शासन पत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.

(जी.वी. धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई-५१.

महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>

क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र.३२५/तांशि-४
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २५ जून, २०१२

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- <u>जात वैधता प्रमाणपत्राबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेताना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक करण्यात यावे किंवा कसे याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात सर्वंकष विचारांती जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भात खालीलप्रमाणे धोरण अनुसरण्यात यावे असे सुनिश्चित केले आहे

१) शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल व्यवस्थापनशास्त्र इत्यादी पदवी अभ्यासक्रम तसेच एम.बी.ए. आणि एम. सी. ए. या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना, जात वैधता प्रमाणपत्र ३ महिन्यांच्या आत सादर करण्याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. थोडक्यात जात वैधता प्रमाणपत्राबाबत जी कार्यपद्धती शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये अनुसरण्यात आली होती, तीच कार्यपद्धती शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये अंमलात आणण्यात यावी.

२) तथापि, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाच्यावेळी संबंधित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे सक्तीचे राहील.

३) सदर बाबीस संचालकांनी प्रिंट मिडीया तसेच इलेक्ट्रॉनिक्स मिडीयामध्ये तात्काळ व्यापकस्वरुपात प्रसिद्धी द्यावी. जेणेकरुन विद्यार्थी आणि पालकांना सदर बाबीची त्वरेने माहिती होईल.

४) सदर बाब तातडीने प्रवेशप्रक्रियेशी निगडीत असलेल्या अधिकाऱ्यांना तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अवगत करावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करुन त्याचा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा, ही विनंती.

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन